# -: प्रकरण - दोन :-

## शेती व्यवसाय

# प्रकरण - २ रे

## शेतीव्यवसाय

### प्रस्तावना :

सतराव्या शतकात आणि त्या पूर्वीही सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदु म्हणजे खेडे होते. खेडयात रहाणा-या लोकांचा व्यवसाय हा शेती असे. शेती व्यवसाय हाच जीवनाचा महत्वाचा मार्ग असल्याने बहुतांशी लोकांचा व्यवसाय शेतीच होता. उद्योगधंदे, व्यापार आणि इतर व्यवसाय याना दुय्यम दर्जाचे स्थान होते. कारण शेती उत्पादनावरच गावचे अधिकारी, मिरासदार, उपरी, बलुतेदार व अलुतेदार यांचे जीवन अवलंबुन असे. विविध घटकांची शेतक-याच्या जीवनावर व त्यांच्या व्यवसायावर पडसाद पडत असे. आर्थिक मदतीचा अभाव, पावसाची अनिश्चितता, नेहमीच्या युध्दांचा प्रसंग इत्यादी कारणामुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय आणि शेतकरी हे दोन्हीही मागासलेल्या अवस्थेत होते.[१]

शेती करणा-यास कुणबी म्हटले जाई. राजवाडे यांनी कुणबी शब्दाच्या उत्पत्ती विषयी माहिती दिलेली आहे. दोन नांगरानी जमीन नांगरली जाते तिला कुळ म्हणत असत. कुळ या शब्दापासुन कुळंबी, कुणबी असा अपभ्रंश झाला म्हणून आजसुध्दा शेतक-याला कुणबी म्हटले जाते. जमीन कसणारा हा मराठा,क्षत्रीय अथवा इतर कोणत्याही जातीचा असला तरी सरकार व सावकार

त्यांना आपले कुळ म्हणत असत.[२]

डॉ.कुलकर्णींच्या मते जिच्यामध्ये मशागत केली जाते ती "काळी आई" होय आणि जिच्यात लोक आपली वस्ती करतात ती "पांढरी आई" होय. या काळ्या आईवर मशागत करुन शेतकरी पिके काढीत असत.[३]

वा.कृ.भावे यांनी आपल्या " पेशवेकालीन महाराष्ट्र " या पुस्तकात पांढरीत व काळीत कष्ट करणा-यांची तुलना केली आहे. खेडयातील व्यवसायाचे शेतीतील काम करणारे व गावात काम करणारे दोन ठळक भेद असले तरी मुख्य धंदा हा शेतीचाच होता. भावेनी चाणाक्याच्या ग्रंथातील उदाहरण देऊन पुढे म्हटले आहे की, काळीत खपणारे ते कुणबी आणि पांढरीत काम करणारे ते पांढरपेशे.[४] शेती करणा-याचे तीन वर्ग होते. एक मिरासदार, दुसरा उपरी आणि तिसरा वर्ग मजूरांचा. मिरासदारास जमीन कसण्याचा हक्क हा वंशपरंपरेने मिळालेला असे म्हणून त्यांना जमिनीची खरेदी विक्री करता येत असे.[५]

महाराष्ट्रातील शेतक-याला सर्वस्वी पावसावरच अवलंबून रहावे लागे. कारण बागायती क्षेत्र फारच कमी होते. पावसाने दडी मारली तर शेतक-याना दुष्काळासारख्या महान संकटाना तोंड द्यावे लागे. म्हणूनच जमीन पेरणीस योग्य झाली असता शेतकरी पेरणी करण्यासाठी घरी मयत टाकुन शेतावर जाई असे तुकाराम महाराज आपल्या गाथेत म्हणतात.[६] शेती व्यवसायात शेतक-याना अनेक संकटाना तोंड द्यावे लागे.

काबाड कष्ट करुन हाती आलेले धान्य जनावरे, पक्षी आणि शत्रुचे हल्ले यापासुन बचावावे लागे.[७]

पेशवेकाळात शेती हाच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात रहाणा-या लोकांचा व्यवसाय होता. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतक-याचे स्थान महत्वाचे होते. कारण शेतकरी हाच देशाच्या विविध उद्योग - धंधाना कच्चा माल पुरवीत असे.[८]

महाराष्ट्रात शेतकरी अन्नधान्य, भाज्या, इत्यादी पिकांच्या प्रसंगी परिस्थितीशी जुळवून घेई. व्यवसाय म्हणुन शेती केवळ शेतक-याच्या उदर निर्वाहासाठी व चरितार्थासाठी पुरेशी होत नव्हती. त्यांना इतर व्यवसायाचे सहाय्य घ्यावे लागे. आपल्या उत्पन्नाचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक भांडवल शेतक-याजवळ नसे. कारण शेतक-याना आपल्या सर्व गरजा भागवून सरकारी सारा भरल्यानंतर त्याच्या कष्टाच्या मानाने फायदा मिळत नसे. त्याचा परिणाम म्हणून त्याला इतर व्यवसायाकडे वळावे लागे. शेतकरी उद्योगी कष्टाळु आणि सरळमार्गी असला तरी त्याला निसर्गाच्या कृपेवर अवलंबुन रहावे लागे. अवर्षण किंवा पूर याही संकटाना त्यांना तोंड द्यावे लागे. कृत्रीम साधनांच्या द्वारे पाटबंधारे बांधून पाणी पुरवठयाची व्यवस्था ही महाराष्ट्रात थोडयाफार प्रमाणात होती.[९]

महाराष्ट्रात नद्यांच्या खो-यात शेती उच्च प्रमाणात होई. अहमदनगर, पुणे, सातारा, यांच्या सभोवतालचा पट्टा हा अत्यंत सुपीक व सुंदर होता. महाराष्ट्राच्या पश्चिम किनार पट्टीवर तांदळाचे पीक

मोठया प्रमाणावर येई आणि त्यामुळे गहू, तांदूळ इत्यादी धान्याची पैदास विपुल होई.[१०]

पेशवे कालात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने बहुसंख्य लोकांचे जीवन शेतीवर अवलंबुन होते. शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन बंधारे बांधण्याची आणि जुने बंधारे दुरुस्त करण्याच्या अनेक योजना पेशव्यांनी पूर्ण केल्या होत्या. त्याचबरोबर पेशव्यांच्या कांही सरदाराना खिल्लार जनावरे बाळगण्याची हौस होती. शेतक-याना शेतीव्यवसायासाठी चांगली जनावरे उपलब्ध व्हावीत हा खिल्लार बाळगण्यामागे हेतु होता. श्रीपतराव प्रतिनीधी यांच्याजवळ ७०० खिल्लार जनावरे होती.[११] महाराष्ट्राच्या भूमीवर फळबागा व फुलबागा फुलल्या होत्या. शाहूमहाराजांचे गुरु ब्रम्हेंद्र स्वामी यांचे गाव धावडसी हे तर बागबगीच्यानी बहरले होते. विविध प्रकारच्या फळांची झाडे स्वामीनी अतिशय त्रास घेऊन लावली होती. प्रत्यक्ष शाहू महाराजांना फळांची आवड होती आणि नारळ, सुपारी, आंबे यांच्या बागांचेही आकर्षण शाहू महाराजांना होते.[१२]

## जमिनीचे प्रकार :

महाराष्ट्रात जमीन सामान्यपणे डोंगराळ गवताळ व काळया मातीच्या सपाट अशा तीन विभागात विभागली होती. दुसरे वर्गीकरण म्हणजे उत्तम, मध्यम व कनिष्ट जमीनी होत.[१३] शिवकालाप्रमाणे पेशवे जमीनीची पहाणी करुन वर्गवारी ठरवीत असत. त्यामध्ये प्रामुख्याने लागवडीखाली असणारी व लागवडी खाली नसणारी (पडीक) अशा मुख्य

दोन प्रकारात जमिनींची विभागणी केलेली होती. जिराइत जमिनींमध्ये सर्वसाधारण पीके घेतली जात. तर बागायतीत फळफळावळ व भाजीपाला इत्यादी पीके घेतली जात असत. जमिनीला मिळणारे पाणी याचा विचार पेशवे काळात केलेला दिसुन येतो. ज्या जमिनीला कालवा किंवा तळे याद्वारे पाणी पुरवठा होत असे अशा जमिनीला पाटस्थळ जमीन म्हणत असत. तर जी जमीन विहीरीच्या पाण्यावर पिकत असे तिला मोटस्थळ जमीन म्हटले जाई.[१४]

सर्वसाधारणपणे पेशवेकाळात शेरी जमीन (लागवडीखालील जमीन) कुरण (चराउ जमीन), बाग (बाग जमीन) आणि आमराई असे जमिनीचे भाग होते.[१५]

जमिनी लागवडीखाली आणि बागायतीखाली आणण्याचे पेशव्यांचे धोरण :

जिराईत जमिनी बागायतीखाली आणण्याचा प्रयत्न पेशवेकालात केला जाई.[१६] इ.स.१७७१ मध्ये तर्फ जायखेड परगणे पिसोळ, प्रांत बागलाण येथील दोन बंधा-यांपैकी एक वाहून गेलेला बंधारा बांधावयाचे व पाट खणण्याचे प्रयत्न पेशव्यांनी केलेले दिसून येतात.[१७] इ.स. १७७२ मध्ये श्री.बनेश्वर येथील धरणाचे काम ८०० रुपयात करावयास लक्ष्मण कृष्ण यांना पेशव्यांनी आज्ञा केली होती. निम्मा खर्च (रक्कम) सरकारातून आणि निम्मी रक्कम ज्यांची जमीन पाण्याखाली भिजेल त्यांच्याकडून द्यावयाचे ठरले होते.[१८]

पहिल्या बाजीरावाच्या काळापासून सवाई माधवरावाच्या

काळापर्यंत पड जमिनी लागवडीखाली आणण्याबद्दल विविध प्रकारच्या सूचना पेशव्यांनी केलेल्या दिसुन येतात.[१९] नव्या कुळाना जुन्या कुळा-पेक्षा जास्त सवलती मिळत असत. कांही कारणामुळे रयतेस खंडणी देता आली नाही किंवा चुकुन खंडणी जास्त आकारली गेली, तर पेशवे सरकार ताबडतोब लक्ष घालत असे.[२०]

पेशव्यांनी महसूल व्यवस्थेत अत्यंत बारकाईने लक्ष दिलेले दिसून येते. महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणे खानदेशातील शेती ही शेतक-याच्या दृष्टीने जुगार होती. निसर्गाच्या कृपेने पाऊस भरपूर पडला तर शेतातून भरपूर पीके येत. अन्यथा शेतक-याचे जीवन उध्वस्त होई. खानदेशातील अनेक गावांना पेशवेकाळात पाटाद्वारे पाणीपुरवठा केला जाई. लोहणेर येथील धरण १७८९ ला फुटण्याची शक्यता असताना पेशव्यांनी त्यात वेळीच लक्ष घातले आणि तो धोका टळाला गेला.[२१]

या वरील सर्व उदाहरणावरुन असे दिसून येते की, पेशव्यानी पाटबंधा-याद्वारे शेतीला चांगला पाणी पुरवठा ठेवला होता. त्यासाठी त्यांचे सतत प्रयत्न चाललेले असत.[२२] सन १७७१ मध्ये पेशव्यानी जायखेड, परगणे, पिसोळे येथील पाटाच्याबांधकामासाठी ५,०००/-रु.दिले होते.[२३]

यावरुन असे दिसुन येते की, बंधारे बांधणे, कालवे खोदणे आणि त्यांची देखभाल करणे ही सामान्यतः गावातील लोकांची जबाबदारी होती. कालवे, बंधारे गावक-यानी जरी बांधले असले तरी त्यांच्यावर सरकारची सत्ता असे कारण पाणी ही निसर्गाची देणगी होती. बंधारा-च्या बांधकामासाठी लागणा-या खर्चाचा कांही भाग अथवा संपूर्ण भाग सरकार उचलीत असे. पाटाचे पाणी वापरणा-या शेतक-याना इतरापेक्षा

थोडा जास्त कर द्यावा लागे.[२४]

पेशवेकाळातील शेतकरी हा पाटाच्या पाण्याच्या सहाय्याने आणि विहीरी खोदून आपल्या जमिनी पाण्याच्या खाली आणण्याचा प्रयत्न करीत असे. पाऊस झाला नाही तर शेतकरी संकटात येत असत. या संकटावर मात करण्यासाठी पेशव्यानी आपल्या भागातील जमिनीचे क्षेत्र ओलीताखाली आणण्याचे प्रयत्न केलेले दिसुन येतात. कृत्रीम साधनांच्याद्वारे पाटबंधारे बांधुन पाणी पुरवठयाची सोय त्यांनी केली होती. म्हणुन पेशव्यांचे धोरण हे शेतक-या विषयी कल्याणकारी होते असे म्हणावे लागेल.[२५]

## शेती व शेतक-याना संरक्षण :

शेती व शेतक-याना परचक्र, पावसाचा लहरीपणा नैसर्गिक आपत्ती, सैनिकाची धामधुम व प्रचलीत असलेली महसूल पध्दती इत्यादी गोष्टीमुळे शेती व शेतक-याची अनेकदा दुर्दशा होत असे. १८०० ते १८१८ हा दुस-या बाजीराव पेशव्याचा कालखंड सोडल्यास शेती व शेतकरी संरक्षणासाठी पेशवे सरकारने महसुल पध्दतीचे सुसुत्रीकरण, महसुल भरणा पध्दती, सूट, तगाई, इस्तावा, कौल, कर्जपुरवठा, पाणी पुरवठा , धान्याची आयात, स्थलांतरीतांचे पुनर्वसन, इत्यादी गोष्टीकडे जातीने लक्ष दिलेले दिसून येते. इ.स.१७६३ मध्ये थोरले माधवराव पेशवे यांनी राघोबा दादाच्या स्वारीमुळे पिकाची नासधूस व लुटालुट झाली त्यामुळे अहमदनगरच्या किल्ल्याजवळील मालोजी गाडेकर यांच्या शेताचा सारा माफ करण्यात यावा असे पत्र गणेश विठ्ठल कमानिसदार यांना दिले होते.[२६]

शेतक-याना टंचाई व दुष्काळासमयी आवश्यक ते भांडवल उपलब्ध व्हावे, उत्पादन वाढीसाठी शेतक-याना मदत व्हावी, परांगदा झालेल्या शेतक-याना दिलासा मिळावा, तसेच सावकाराच्या जाचातून शेतक-याची मुक्तता व्हावी म्हणुन पेशवे सरकार प्रयत्नशील असे. दुष्काळ, परचक्र, बंड यासारख्या कोणत्याही कारणाने शेतीला व शेतक-यास झळ पोहचल्यास चौकशी करुन योग्य हवाला मिळाल्यानंतर पेशवे सरकारातून नुकसान भरपाई दिली जाई. सन १७५१ मध्ये पाचोरा गावच्या लोकांनी पीक न आल्यामुळे सा-यात सूट मिळावी म्हणुन प्रयत्न केले होते.[२७]

महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणे नगर भागातही शेती व्यवसाया-साठी आणि विकासासाठी पेशवे सरकार प्रयत्नशील असे. परंतु १८०० ते १८१८ या काळात पेशवा बाजीराव दुसरा याने नव्या प्रथा व नव्या पध्दती सुरु केल्यामुळे शेती व शेतक-याकडे दुर्लक्ष केले गेले.[२८]

शेतकरी घेत असलेली पीके व फळफळावळे जमिनीची सुपीकता व निसर्गाची अनुकूलता, मानवी कष्ट, जमिनीला होणारा कृत्रीम पाणीपुरवठा, सुधारीत शेती अवजारे इत्यादी गोष्टीवर पिकपाण्याची उत्पादन क्षमता अवलंबून असते. कष्टाच्या जोडीला सुधारीत शेती अवजारे आजच्या सारखी त्या काळात नव्हती. धान्य, तेलबीया, पालेभाज्या, नगदी पिके व फळे यांचे उत्पादन महाराष्ट्रातील विविध भागातून होत असे. हंगामाचे दोन प्रकार होते. वेगवेगळ्या हंगामात वेगवेगळी पिके घेतली जात असत. रब्बी हंगामात नागळी, जवस, उडीद, भात, मका, कापूस, ऊस, ज्वारी, बाजरी, कुळीते इत्यादी पिके घेतली जात. तेलबियामध्ये जवस, करडी, भुईमुग, तीळ, एरंड, मोहरी यांचा समावेश होत असे.

फळफळावळामध्ये आंबा, चिंच, नारळ, केळी, पपई, पेरु, यांचा समावेश होत असे.[२९]

ज्वारीचे पीक हे रब्बी आणि खरीप हंगामात घेतले जाई. बाजरीचे पिक हे आक्टोंबरमध्ये येत असे. गव्हाचा हंगाम हा जानेवारी ते फेब्रुवारीच्या दरम्यान असे. नागली, ज्वारी, सावा ही पिके मोठया प्रमाणात कोकण भागात घेतली जात असत. उसासाठी काळी जमीन आवश्यक असे. त्याच बरोबर अनेक खरिपाची पिके पेशवेकाळातील शेतकरी घेत असत. त्यात प्रामुख्याने कुळीत, पावटे, उडीद, तुर, इत्यादी धान्याचा समावेश होत असे.[३०]

पेशवेकाळात या अनेक पिकाबरोबर वेगवेगळया फळफळावळाचे उत्पादन घेतले जात असे. शाहू महाराजाना व ब्रम्हेंद्रस्वामींना वृक्षवेलीची आणि फळाफुलांची फार आवड म्हणुन त्यांनी एकमेकाच्या सहकार्याने महाराष्ट्रास वृक्षवेलीनी रमणीय बनवले होते.[३१]

शाहुमहाराजांना आंब्याची फार आवड. त्यांनी बाजीरावास आंब्याची झाडे लावण्याकरिता अनेक गांवातुन आंब्याची रोपे आणावयास सांगीतले होते.[३२]

पेशव्यांच्या अनेक बागापैकी सुपे, आंबी, व पुणे येथे बागा होत्या. हिराबाग, सरसबाग, वसंतबाग, मोतीबाग , पर्वती बाग , कात्रज बाग, इत्यादी महत्वाच्या बागा होत्या. इ.स.१७५५ मध्ये नानासाहेबांनी हिराबाग तयार केली.[३३]

असे असले तरी शेतीही शेतक-याच्या उदरनिर्वाहासाठी व चरितार्थासाठी पुरेसी नव्हती म्हणुन शेतक-याना दुधापासुन निर्माण होणारे पदार्थ दही, लोणी, तुप इत्यादी पदार्थ तयार करुन आपल्या मिळकतीस जोड द्यावी लागे.[३४]

त गा ई :

ज्या शेतक-याना बैल, शेती, शेतीअवजारे, बि-बियाणे घेण्यासाठी पैसा नसे अशा शेतक-यांना सरकारातून कर्ज मिळे. शेतीसाठी जी कर्जे दिली जात त्या कर्जाना तगाई म्हणत असत. तगाईची परतफेड हप्त्या हप्त्याने केली जाई. एखाधा शेतक-याने तगाईची फेड मुदतीपूर्वी केली नाही तर त्याच्या घरावर, शेतावर जप्ती येई. हे कर्ज देताना शेतक-याना जमीन तारण द्यावी लागे. सरकार शेती सुधारण्यासाठी या प्रमाणे जे कर्ज देई त्या कर्जाला तगाई म्हणत असत. राजानी शेतक-याना मदत म्हणून कर्ज देण्याचा प्रघात हिंदुस्थानात प्राचीन काळा-पासून आहे. अत्रे टी.एन. यांनी " गावगाडयात " तगाईचा अर्थ दिलेला आहे. तगणे म्हणजे कष्टाने जीव धरुन रहाणे होय.[३५] तगाईची पध्दती ही शिवकाळापासून अस्तित्वात होती. या पध्दतीचे दोन उपयोग डॉ. सेननी सांगितले आहेत. ते म्हणजे शेतक-याला दुष्काळ व टंचाईच्या वेळी सरकारकडून पैसे उपलब्ध होणे आणि सावकारी पाशातुन रयतेची सुटका होणे[३६] हे होत.

अशाप्रकारे शेतक-याच्या अनेक गरजा सरकारातून भागविल्या जात. शेतीची जी उपकरणे होती ती तयार करण्यासाठी बी-बियाणा-

साठी, जनावरे आणि इतर शेतीच्या कामासाठी सरकारातून मदत मिळे. या सरकारी कर्जामुळे शेतक-याना त्यांच्या वरील सावकारी पाश कमी होण्यास मदत होई. त्यामुळे शेतीचा व्यवसाय आणि उदरनिर्वाह चालविण्यासाठी सावकाराकडे न जाता लोक सरकारची मदत घेऊ लागले.[१७] तगाई हे एक शेतक-याना त्यांच्या व्यवसायात मिळणारे चांगले साधनच होते असे म्हणावे लागेल.

दुष्काळ :

शेती आणि शेतक-याना भेडसावणारे सर्वात महान संकट म्हणजे दुष्काळ होय. प्राचीन काळी अथवा मध्ययुगीन काळात दुष्काळ ही एक नैसर्गिक आपत्ती अथवा देवीचा कोप आहे असी समजूत होती. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे दुष्काळाचा तडाखा मोठयाप्रमाणात शेतक-यांना बसत असे. पाऊस नाही झाला तर पिके येत नसत. आणि त्यामुळे मोठया प्रमाणात उपासमार होई. महाराष्ट्राच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ हे शेतक-याना एक आव्हानच होते.[३८]

सतराव्या व अठराव्या शतकात दुष्काळाची परिस्थिती निर्माण होण्यासाठी अवर्षण एक मेव कारण नसून शत्रुनी राज्यात केलेली पीकहाणी, जाळपोळ, लुटालुट ही सुध्दा दुष्काळाची कारणे होती. दुष्काळामुळे सारे ग्रामीण जीवन विस्कळीत होत असे. अनेक लोक देशोधडीला लागत. जनावरे नष्ट होत आणि कमालीचे दारीद्रय निर्माण होई व शेती व्यवसायाची धुळधाण होई. मध्ययुगीन भारताचा आर्थिक इतिहास लिहणारा मोरलँड याने १७ व्या शतकातील लहानमोठया

दुष्काळाची माहिती दिलेली आहे. त्याच्या मते महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यात अवर्षणामुळे धान्य टंचाई निर्माण झाली होती. अनेक कुटुंबाचे विघटन झाले व शेती व्यवसाय मोडकळीस आला होता.[३९]

पेशवेकाळात दुष्काळामुळे शेतकरी अनेक वेळा ह हैराण झालेले होते. इ.स.१७७८ मध्ये कालोलीच्या मुकादमाने सासवडच्या देशपांडे यास दुष्काळाची माहिती कळविली होती. " पिकपाणी नाही उपासी मरताती जोंधळ्यांस जो एक दोन मोड हरणे खाताती."[४०] तसेच आणखीन एका पत्रावरुन पेशवाईतील दुष्काळाची माहिती समजून येते. क-हेपठार येथे दुष्काळ पडला; गुरांचा नायनाट झाला पिके आली नाहीत, धान्याचे भाव कडाडले, सरकारची वसुली आली. सर्व गावक-यानी मिळून कर्ज काढून पैसे भरले अशी माहिती क-हेपठारातील खंडो त्रिंबक याने पुणे प्रांती कळविली होती.[४१]

## शेतक-याना सा-यात मिळणारी सुट :

पेशवे काळात शेतीच्या व्यवसायाला अतिशय महत्वाचे स्थान असल्याने मोठ्या प्रमाणात पडीक जमिनी लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न पेशव्यांनी चालविले होते. शेतक-याना अनेक संकटाना तोंड द्यावे लागे. त्यामध्ये प्रामुख्याने दुष्काळ, शत्रुपक्षाची लुटमार, सैनिकांचा त्रास आणि रोगराई इत्यादी कारणाने शेतक-याच्या जमिनी पिकल्या नाहीत. तर अशा वेळी त्यांना सा-यात सूट मिळे. सन १७४६ मध्ये कानु तर्फ नाणे हे गाव आगीमध्ये जळून भस्मसात झाले तेंव्हा त्या गावावर असणा-या सा-यापैकी १ खंडी १२ मण एवढा महसुल माफ करण्यात आला होता.[४२]

सन १७४८ मध्ये बाकवडा परगण्यातील रामचंद्र बल्लाळ याने त्या परगण्यातील दुष्काळाची सविस्तर माहिती पेशव्याना कळविली होती. तेंव्हा त्याचा विचार करुन पेशव्यानी त्या परगण्याचा शेतसारा पुढील चार वर्षासाठी माफ केला होता.[४३] सन १७५१ मध्ये पाचो-याच्या गावक-यानी सरकारकडे पीक न आल्या बद्दल सा-यात सूट मिळावी म्हणुन विनंती केली होती. त्यावेळी पेशव्यानी निम्मा सारा चार हप्त्यात भरण्याची परवानगी दिली होती.[४४]

इ.स.१७६३ साली जुन्नर गाव दंग्यामुळे लुटला गेला व जळाला तेंव्हा तेथील अधिका-यानी माधवराव पेशव्याकडे सा-यात सूट मिळावी म्हणुन मागणी केली होती. शेतक-यांच्या विनंतीचा आणि परिस्थितीचा विचार करुन माधवरावाने कांही तत्वाच्या आधारे शेतसा-यात दोन वर्षे सूट दिली. जी गावे पूर्णपणे जळाली व जनावराची लूट झाली त्या गावाना पूर्णपणे एक वर्ष सा-यात सूट द्यावी, जी गावे अंशत: जळाली त्याना ५०% सा-यात सूट द्यावी व जी गावे लुटली गेली त्यांच्याकडून १ वर्षासाठी १/३ सारा द्यावा अशा सवलती दिल्या गेल्या. ज्या गावानी खंडणी देउन संरक्षण केले त्या गांवानी १ वर्षे निम्मा महसुल द्यावा व ज्या गांवाना उपद्रव झाला नसेल त्यांनी पूर्ण महसूल द्यावा[४५] अशा आज्ञा सरकारकडून करण्यात आल्या.

इ.स.१७६९ मध्ये पुण्याजवळील गारपिर येथील मुक्कामावर असताना पेशव्यांच्या सैनीकानी पिकांची नासाडी केली. तेंव्हा चौकशी करुन शेतक-याना योग्य नुकसान भरपाई दिली गेली.[४६]

अशा प्रकारे शेती हा आर्थिक जीवनाचा पाया असल्याने शेतीचा विकास कसा होईल याकडे राजकर्त्यांनी लक्ष घातलेले दिसून येते. शेतक-याचे जीवन कष्टाचे असे. प्रचंड काबाडकष्ट करून सुध्दा शेतक-याची आर्थिक स्थिती फार चांगली नव्हती. शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या मर्जीवर ब-याच वेळा शेतक-याला अवलंबून राहावे लागे. शिवाय लष्कराचा उपद्रव, लुटालुट सारख्या संकटातून शेतक-याला आपले जीवन कंठावे लागे.

-x-x-x-x-x-

सं द र्भ :


१. कुलकर्णी अ.रा. , शिवकालीन महाराष्ट्र पृ.५६.

२. राजवाडे वि.का., कुंकबी, भारतीय इतिहास संस्कृति मंडळ , शके १८३२, पृ.१५.

३. कुलकर्णी अ.रा. , शिवकालीन महाराष्ट्र, पृ.१०.

४. भावे वा.कृ. , पेशवेकालीन महाराष्ट्र , पृ.३४३.

५. राजवाडे वि.का. , कुंकबी , भारतीय इतिहास संस्कृति मंडळ , शके १८३२, पृ. १५.

६. तुकारामाची गाथा , ओवी क्र.८२३.

७. कित्ता, ओवी ११४९ , २२८९ .

८· डॉ·शशिकांत कर्णिक , पेशवेकालीन महाराष्ट्र , सामाजिक व आर्थिक जीवन, भा· इ· आणि सं· वर्ष २३, पु·८९, पृ·५८·

९· डॉ·शहा जी·बी· , पेशवेकालीन खानदेशात शेताला होणारा पाणीपुरवठा, भा·इ·आणि सं· वर्ष २५, पु·९९, पृ·३५·

१०· डॉ·कर्णिक शशिकांत, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भा·इ·आणि सं·, वर्ष २३, पु·८९, पृ·६१·

११· शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राची संस्कृति घडण आणि विकास, पृ·३००·

१२· कित्ता, पृ·३०·

१३· चिटणीस कृ·ना· , मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था , पृ·१७६·

१४· भावे वा·कृ· , पेशवेकालीन महाराष्ट्र , पृ·३५०·

१५· Sen S.N. , Administrative System of the Marathas,P.167.

१६· वाड ग·चि· , पे·रो· , खं· ७, पृ·१६·

१७· वाड ग·चि·, पे·रो· , खं·७, ले·४२६, पृ·१६·

१८· कित्ता, ले·४२७·

१९· कित्ता, ले·४२८·

२०· वाड ग·चि·, पे·रो· , खं·७ , पृ·१, पे·४१२·

२१· जोशी ची·ब· , पेशवाईतील महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास, भा·इ·स·मं· , वर्ष १५, अं· २, पृ·६५·

२२. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राची संस्कृति, घडण आणि विकास, पृ.३००.

२३. वाड ग.चि. , पे.रो., खं.७ , पृ.१६ .

२४. कुलकर्णी अ.रा. , शिवकालीन महाराष्ट्र , पृ.७०

२५. डॉ.कर्णिक शशिकांत, पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक जीवन, भा.इ. आणि सं., वर्ष-२३, पृ.८९, पृ. ६१.

२६. कित्ता, पृ.१३.

२७. Sen S.N., Administrative System of the Marathas,P.180.

२८. ठुबे यु.आर. , पेशवेकालीन अहमदनगर सरकारमधील शेती व शेतकरी संरक्षण, भा.इ.आणि सं., व-२६, पृ.१०२, पृ.१३,२० .

२९. चिटणीस कृ.ना. , मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था,पृ.२८७

३०. Dekhane K.D., Agrarian System in Maharashtra Under Peshwa, (Ph.D.Thesis) P.P. 68,69.

३१. भावे वा.कृ. , पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.१४०.

३२. सरदेसाई , पे.द. , खं.९ , पृ.३५.

३३. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.१४६.

३४. डॉ.कर्णिक शशिकांत, पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक जीवन, भा.इ.सं.मं., वर्ष २३, पु.८९,पृ. ५९.

३५. अत्रे टी.एन्., गावगाडा, पृ.१३१.

३६. Sen S.N., Administrative System of the Marathas, P.P. 182, 183.

३७. अत्रे टी.एन्., गावगाडा , पृ.१३१, १३२.

३८. कुलकर्णी अ रा. , शिवकालीन महाराष्ट्र , पृ.७७.

३९. Moreland W.H., Agrarian System of the Moslem India, P. 145.

४०. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.७.

४१. कित्ता, पृ.१८, १९.

४२. Sen S.N., Administrative System of the Marathas, P.P. 179- 180.

४३. कित्ता.

४४. कित्ता.

४५. वाड ग.चि., पे.रो., खं.७, ले.४३०.

४६. कित्ता, पृ.२१, ले.४३२.

=0=0=0=0=0=